प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः मत्स्यआ-२०१६/प्र.क्र.२८३/पदुम १२
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- २५ /१०/२०१७

वाचा:- अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचे क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-A/१६-ब, दि.१८.१०.२०१७ चे पत्र.

शासन आदेश:-

मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखालील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय गट-अ (वेतनबँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन-५,४००) या संवर्गात कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यास प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) (वेतनबँड रु.१५,६००-३९,१०० ग्रेड वेतन रु.६,६००) या पदावर खालील अटींच्या अधिन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर रकाना ३ येथे दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३
१	श्री.र.भि.वायडा, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, (तांत्रिक) ठाणे-पालघर	प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर

अटी व शर्ती:-

(१) सदर पदोन्नत्ती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, साप्रवि शासन निर्णय दिनांक २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

(२) सदर तात्पुरती पदोन्नती ही निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मिळणाऱ्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(३) श्री.वायडा यांनी पदोन्नतीच्या पदावर पदग्रहण केल्यापासून १ महिन्याच्या आत वेतन निश्चितीचा विकल्प दयावा. असा विकल्प विहित मुदतीत न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र.११ (ए) अनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

(४) सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी राहिल.

संबंधित अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व रुजू अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१०२७१४५९१०९००१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.10.27 14:46:27 +05'30'

(र. व. गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
३. मा.सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई-३२.
४. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
५. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/
६. नागपूर/लातूर
७. सर्व सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) मत्स्यव्यवसाय (जिल्हा कार्यालये)
८. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२.मुंबई/नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१०.संबंधित अधिकारी, द्वारा आयुक्त मत्स्यव्यवसाय
११.सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२/१६-ब, मंत्रालय,मुंबई
१२.निवडनस्ती पदुम-१२